

# ५१ राज्याचा महाधिवक्ता

राज्यघटनेच्या कलम १६५ मध्ये राज्याच्या महाधिवक्ता या पदाची तरतूद केली आहे.[१] हा राज्यातील सर्वोच्च कायदा अधिकारी असतो. केंद्रीय स्तरावर महान्यायवाद्यास जे स्थान आहे, तेच राज्यस्तरावर महाधिवक्त्यास आहे.

## नियुक्ती आणि कार्यकाल

राज्यपाल महाधिवक्त्याची नियुक्ती करतो. उच्च न्यायालयाचा न्यायाधीश म्हणून नियुक्त होण्यासाठी जी अर्हता आवश्यक असते ती अर्हता त्याच्याजवळ असणे आवश्यक असते. म्हणजेच तो भारताचा नागरिक असावयास हवा आणि न्यायिक पदावर[२] त्याने १० वर्षे काम केले असले पाहिजे किंवा उच्च न्यायालयांत त्याने १० वर्षे वकिली केली[३] असली पाहिजे.

महाधिवक्त्याचा कार्यकाल राज्यघटनेने निश्चित केलेला नाही; तसेच राज्यघटनेत त्याच्या पदच्युतीची कारणे व प्रक्रियाही दिलेली नाही. राज्यपालाच्या मर्जीनुसार तो पदावर राहू शकतो. म्हणजेच राज्यपाल त्याला केव्हाही पदच्युत करू शकतो. तोसुद्धा राज्यपालाला राजीनामा सादर करून पदमुक्त होऊ शकतो. सरकारच्या सल्ल्यानुसार त्याची नियुक्ती होत असल्याने ज्यावेळी सरकार (मंत्रिमंडळ) राजीनामा देते किंवा त्याजागी दुसरे सरकार येते त्यावेळी प्रथेनुसार तो राजीनामा देतो.

महाधिवक्त्याचे वेतन राज्यघटनेद्वारे ठरविण्यात आलेले नाही. राज्यपाल ठरवील त्याप्रमाणे त्याला वेतन मिळते.

## कर्तव्ये व कार्ये

राज्यातील मुख्य कायदा अधिकारी म्हणून महाधिवक्त्याच्या कार्यात खालील बाबींचा समावेश होतो–

(१) राज्यपालाने त्याच्याकडे पाठविलेल्या मुद्द्यांवर राज्य सरकारला कायदेशीर सल्ला देणे.

(२) राज्यपालाने सोपविलेली कायदेशीर स्वरूपाची इतर कामे करणे.

(३) राज्यघटना किंवा इतर कायद्यांनी त्याच्यावर सोपविलेली कार्ये करणे.

अधिकृत कामे पार पाडण्यासाठी राज्यातील सर्व न्यायालयांमध्ये बाजू मांडण्याचा महाधिवक्त्याला अधिकार आहे. शिवाय राज्य विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या कामकाजात किंवा विधिमंडळाच्या ज्या समितीचा तो

---

(१) राज्यघटनेतील भाग सहा (राज्ये) मधील प्रकरण दोन (कार्यकारी विभाग) मध्ये कलम १६५, राज्याच्या महाधिवक्त्याच्या पदासंदर्भात आहे. या पदासंदर्भात हे एकमेव कलम आहे.

(२) न्यायिक पद म्हणजे राज्याच्या न्यायिक सेवेतील पद.

(३) उच्च न्यायालयाचा न्यायाधीश नामवंत कायदेपंडित असावा, अशी नियुक्तीची तरतूद राज्यघटनेत नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या बाबतीत तशी तरतूद राज्यघटनेत आहे.

सदस्य असेल त्यामध्ये बाजू मांडण्याचा व सहभागी होण्याचाही त्याला अधिकार आहे. अर्थात, मतदानाचा अधिकार त्याला नाही. राज्य विधिमंडळाच्या सदस्यास मिळणारे सर्व विशेषाधिकार फायदे व संरक्षण त्याला मिळते.

### दृष्टिक्षेपात महाधिवक्त्याशी संबंधित कलमे

| कलम | विषय |
|---|---|
| १६५ | राज्याचा महाधिवक्ता |
| १७७ | राज्य विधिमंडळाची गृहे व समिती यांसंदर्भात महाधिवक्त्याचे अधिकार |
| १९४ | महाधिवक्त्याचे अधिकार, विशेषाधिकार आणि कायदेशीर संरक्षण |

### दृष्टिक्षेपात घटनात्मक संस्थांशी संबंधित कलमे

| कलम | घटनात्मक संस्था |
|---|---|
| ७६ | भारताचा महान्यायवादी |
| १४८ | भारताचा महालेखापरीक्षक |
| १६५ | राज्याचा महाधिवक्ता |
| २४३-आय | राज्यवित्त आयोग |
| २४३-के | राज्य निवडणूक आयोग |
| २४३-झेडडी | जिल्हा नियोजन समिती |
| २४३-झेडइ | महानगर नियोजन समिती |
| २६३ | आंतरराज्य परिषद |
| २८० | वित्त आयोग |
| ३०७ | आंतरराज्य व्यापार व वाणिज्य आयोग |
| ३१५ | केंद्रीय लोकसेवा आयोग व राज्य लोकसेवा आयोग |
| ३२४ | निवडणूक आयोग |
| ३३८ | अनुसूचित जातींसाठी राष्ट्रीय आयोग |
| ३३८ ए | अनुसूचित जमातींसाठी राष्ट्रीय आयोग |
| ३३९ | अनुसूचित क्षेत्रे व अनुसूचित जमाती आयोग |
| ३४० | मागासवर्गीय आयोग |
| ३४४ | अधिकृत भाषा आयोग आणि संसदेची अधिकृत भाषा समिती |
| ३५० बी | भाषिक अल्पसंख्याकांसाठी विशेष अधिकारी |